महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित
दुरध्वनी क्र. : २६४७ ४२११ विस्तारित ३६४२ दूरभाष क्र. : ०२२-२६५८ १५१६.
२रा माळा, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
ई-मेल : promahagenco@gmail.com / aphale.mahesh@gmail.com

**संदर्भ :** मा.सं./जनसंपर्क/वृत्तपत्र टिप्पणी/

## वृत्तपत्र टिप्पणी

## महानिर्मितीचा शिवाजीनगर, साक्री येथील १५० मेगावॅटचा सौर प्रकल्प वेगाने प्रगतीपथावर

**मुंबई (दि. ११/०३/२०१३) :**

महानिर्मितीच्या शिवाजीनगर, ता. साक्री, जि. धुळे येथील एकुण १५० मेगावॅट क्षमतेच्या महत्वाकांक्षी सौर प्रकल्पाची उभारणी प्रत्यक्ष प्रकल्पस्थळी वेगाने सुरु असून लवकरच त्यातून वीजनिर्मिती सुरु होणार आहे. एकाच जागी उभारण्यात आलेला देशातील हा सर्वात मोठा सौर ऊर्जा प्रकल्प असून महानिर्मितीच्या या महाकाय प्रकल्पामुळे राज्याने आता सौर ऊर्जेत गरुडझेप घेतली आहे. राज्यातील विजेची वाढती गरज व ग्लोबल वॉर्मिंगच्या संकटावर मात करण्यासाठी जगात सुरु असलेल्या प्रयत्नांस अनुसरुन अपारंपारिक ऊर्जा क्षेत्रात स्वयंपूर्णतेच्या दृष्टीने महानिर्मितीचा हा प्रकल्प फार महत्वाची भूमिका बजावणार आहे.

या प्रकल्प उभारणीचे काम सुरु झाल्यानंतर या माळरान सदृश परिसराचा वेगाने कायापालट होताना दिसत असून परिसरातील स्थानिक हातांना मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध झाला आहे. हा प्रकल्प नियोजित वेळेनुसार पूर्ण करण्यासाठी महानिर्मितीचे व्यवस्थापन-अधिकारी-कर्मचारी तसेच कंत्राटदार संस्थांचे शेकडो कारागीर गेल्या काही महिन्यांपासून अहोरात्र मेहनत घेत आहेत. प्रकल्प उभारणीची पाहणी करण्यासाठी महानिर्मितीचे व्यवस्थापकीय संचालक श्री. आशीष शर्मा, प्रभारी संचालक (प्रकल्प) श्री. चंद्रकांत थोटवे यांनी नुकतीच सदर सौर प्रकल्पस्थळी भेट दिली.

या प्रकल्पापैकी एकूण १०० मेगावॅट (२५x४) क्रिस्टलाईन फोटो व्होल्टाईक तंत्रज्ञानावर आधारित असून उर्वरित ५० मेगावॅट (२५x२) थिन फिल्म फोटो व्होल्टाईक तंत्रज्ञानावर आधारित आहे. त्यासाठी एकूण ८,२३,३१९ सौर मॉड्युल्स उभारण्यात येत आहेत. सदर प्रकल्पासाठी सुमारे ३८१ हेक्टर जमीन संपादित करण्यात आलेली असून त्यापैकी सुमारे ३२५ हेक्टर जमीन वन विभागाने उपलब्ध करुन दिलेली आहे. आंतरराष्ट्रीय किर्तीच्या 'नासा' या संशोधन संस्थेने साक्री परिसरातील सौर विकिरणाचे (Rediation) प्रमाणासंबंधी केलेल्या अभ्यासाच्या आधारावर या परिसराची निवड महाकाय सौर प्रकल्पासाठी करण्यात आलेली आहे. एकूण सुमारे १६४२ कोटी किंमतीच्या सदर प्रकल्पाचे काम हे ई.पी.सी. तत्वावर देण्यात आलेले असून सदर प्रकल्पाचे संचलन व देखभाल-दुरुस्तीचे काम संबंधित कंत्राटदारांकडून पुढील दहा वर्षांसाठी केले जाणार आहे. या प्रकल्पातून प्रतिवर्षी एकूण सुमारे २४० दशलक्ष युनिटस् इतकी वीजनिर्मिती साध्य होणार असून या विजेचे पारेषण, वहन करण्यासाठी वीज उपकेंद्र उभारणीचे कामदेखील वेगाने प्रगतीपथावर होत आहे.

इंडो-जर्मन संयुक्त सहकार्य करारांतर्गत सदर महत्वाकांक्षी सौर प्रकल्पास मेसर्स. के.एफ.डब्ल्यु. जर्मनी या वित्त संस्थेतर्फे २५० दशलक्ष युरो (सुमारे १६०० कोटी रुपये) इतके वित्त सहाय्य करण्यात येत आहे. तसेच कार्बन उत्सर्जन सुमारे २.२ लक्ष सी.ई.आर. इतक्या प्रमाणात

कमी होणार असून त्यायोगे स्वच्छ विकास प्रणालीअंतर्गत प्रतिवर्षी सुमारे १० कोटीचा परतावा महानिर्मितीस मिळणार आहे.

हा प्रकल्प मार्गी लावण्यासाठी महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी विविध पातळींवर प्रयत्न केले असून केंद्रीय वन सल्लागार समिती (एफ.ए.सी.) द्वारे एक विशेष प्रकरण म्हणून महानिर्मितीच्या या प्रकल्पासाठी वन विभागाची सुमारे ३२५ हेक्टर जमीन उपलब्ध झाल्यानंतर गेल्या काही महिन्यांपासून प्रत्यक्ष उभारणीचे काम सुरु करण्यात आले आहे. या प्रकल्पास स्थानिक प्रशासन, जनप्रतिनिधी व स्थानिक जनतेचे सहकार्य मिळत असल्याने या प्रकल्पाची उभारणी वेगाने सुरु आहे. प्रकल्पस्थळी अधीक्षक अभियंता श्री. जारी, कार्यकारी अभियंता श्री. एस.डी. महाजन व श्री. डोंगरवार व त्यांचा चमू अहोरात्र मेहनत घेत आहे.

कोळशाचे मर्यादित साठे, जलविद्युत निर्मितीस असलेल्या भौगोलिक मर्यादा, तसेच पर्यावरण संरक्षणासाठी पर्यायी व अक्षय्य ऊर्जा स्त्रोत विकसित करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने सौर ऊर्जा निर्मितीस अधिकाधिक प्रोत्साहन देण्याची भूमिका घेतलेली आहे. महाराष्ट्र राज्याचे मा. मुख्यमंत्री व मा. उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री यांनी राज्याला विजेच्या बाबतीत स्वयंपूर्ण करण्यासाठी ऊर्जेच्या सर्व पर्यायी स्त्रोतांचा उपयोग करुन घेण्याची भूमिका सातत्याने मांडलेली आहे.

सदर प्रकल्पाव्यतिरिक्त उस्मानाबाद व परभणी येथेही मोठे सौर प्रकल्प उभारण्याचा महानिर्मितीचा मानस आहे. चंद्रपूर येथे यापूर्वी महानिर्मितीने एकूण ५ मेगावॅट क्षमतेचा वीजप्रकल्प यशस्वीपणे कार्यान्वित केलेला आहे.

---------------------------------------------------------------------------

दिनांक : ११/०३/२०१३.

प्रति,
**माननीय संपादक,**
दैनिक

आदरणीय महोदय,

कृपया सदर बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकाच्या सर्व आवृत्तीत प्रसिध्द करावी, ही नम्र विनंती.

धन्यवादासह,

आपला स्नेहांकित,

**जनसंपर्क अधिकारी**








03 03 2013